**आर बी आय / २००५-०६/ १०७**
**डी सी एम ( पी एल जी ). क्र. जी ७/ १०.१.००/ २००५-०६**

**ऑगस्ट १०, २००५**

अध्यक्ष/ एमडी/ सी एम डी/ सी इ ओ
सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी क्षेत्रातील बँका / परदेशी बँका

प्रिय महोदया/ महोदय,

**अतिरिक्त/ नवीन सुरक्षा लक्षणांनी युक्त भारतीय चलनी नोटा**

कृपया आमचे पत्र आरबीआय / २००४- ०५/ ४५८ डीसीएम (पीएलजी) क्र. जी. ४०/ १०.०१.००/ २००४-०५ दिनांक मे ०७, २००५ चा संदर्भ घ्यावा. त्यात मुंबई येथे मे २५, २००५ रोजी झालेल्या, बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या सभेमधील चर्चा आणि भारतीय चलनी नोटांमध्ये अंतर्भूत करावयाच्या अतिरिक्त / नवीन सुरक्षा लक्षाणांबद्दलची माहिती आपणास पाठविली गेली होती.

२. अतिरिक्त/ नवीन सुरक्षा लक्षणांनी अशा रू ५० व रु १०० च्या चलनी नोटा ऑगस्ट २००५ मध्ये प्रसृत केल्या जातील. त्यानंतर रु.५०० व रु.१००० च्या चलनी नोटा सप्टेंबर २००५ मध्ये प्रसृत केल्या जातील. रू १० व रु २० च्या अतिरिक्त/ नवीन सुरक्षा लक्षणयुक्त नोटा मात्र २००६ मध्ये प्रसृत करण्याचे ठरले आहे.

३. आम्ही यासोबत, आपल्या उपयोगासाठी, रु ५० व रु १००च्या चलनी नोटांमधील अतिरिक्त / नवीन सुरक्षा लक्षणांबाबत प्रसृत केलेल्या प्रेस रिलीजची एक प्रत जोडत आहोत. या नोटा आमच्या वेबसाईटवर (www.rbi.org.in) प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. जनतेच्या व आपल्या कर्मचाऱ्यांच्या उपयोगासाठी आपण या, अतिरिक्त/ नवीन सुरक्षा लक्षणांनी युक्त असलेल्या नोटांना प्रसिध्दी द्यावी. तसेच आपल्या शाखेतही ती प्रदर्शित करावी.

४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

(यु एस पालीवाल )
मुख्य महाव्यवस्थापक